# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:25.02.2026** **वार:बुधवार**

•भारताला आरोग्यसेवा केंद्र बनवण्यासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन

•गोंदिया-जबलपूर रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणासह ३ रेल्वे प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

•वर्तमान आर्थिक वर्षासाठी ११ हजार ९५५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विधानसभेत सादर

आणि

•बारामती विमान अपघात प्रकरणी, VSR व्हेंचर्स कंपनीच्या चार विमानांच्या उड्डाणावर डीजीसीएकडून स्थगिती

**<u>राष्ट्रपती</u>**

भारताला आरोग्यसेवा केंद्र बनवण्यासाठी आणि विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी खाजगी क्षेत्र, सामाजिक संस्था, विचारवंत आणि अन्य संबंधितांनी एकत्र यावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. जीव रक्षण आणि आरोग्यसंपन्न भारताची निर्मिती या देशव्यापी मोहीमेचा प्रारंभ काल मुंबईत राष्ट्रपतींच्या हस्ते झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. आरोग्याचं महत्त्व सांगतानाच केंद्र सरकारच्या आरोग्यसेवाविषयक विविध योजनांची माहिती त्यांनी दिली. बदलत्या काळात मानसिक अस्वस्थतेचा शारीरिक आरोग्यावर परिणाम होत आहे असं सांगून मानसिक आरोग्याच्या महत्त्वाबद्दल राष्ट्रपती म्हणाल्या,

या कार्यक्रमाला राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर तसंच अन्य मंत्री आणि मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

दुर्गम भागातील खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचून त्यांना दर्जेदार आरोग्य सुविधा देणं हे पवित्र कार्य असल्याचं राज्यपाल यावेळी म्हणाले. रुग्णांना त्यांच्या घरापासून ५ किलोमीटर अंतराच्या आत उपचार सुविधा मिळाव्यात यासाठी राज्य शासन करत असलेल्या उपाययोजनांची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**<u>राष्ट्रपतीदौरा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज शेगावमधल्या राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचं उद्‌घाटन होणार आहे. आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांनी हा मेळावा आयोजित केला आहे. चार दिवसांच्या या मेळाव्यात नागरिकांना आयुर्वेद, योग आणि इतर पारंपरिक आरोग्यसेवा शाखांसह विविध आयुष प्रणालीं मार्फत मोफत आरोग्य तपासणी, वैद्‌यकीय सल्ला आणि औषधं घेण्याची संधी मिळेल. नागपूरमध्ये आयोजित; “एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचं सुवर्णयुग”; या उपक्रमाच्या उद्‌घाटन समारंभालाही राष्ट्रपती आज उपस्थित राहणार आहेत.

**<u>केंद्रियमंत्रीमंडळ</u>**

नवी दिल्लीत नव्यानं उभारलेल्या सेवा तीर्थ संकुलात काल प्रथमच केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. २०४७पर्यंत भारताला समृद्‌ध, सक्षम, आणि आत्मनिर्भर राष्ट्र बनवण्याच्या दृष्टीनं या वास्तूत घेतला जाणारा प्रत्येक निर्णय देशातल्या १४० कोटी नागरिकांच्या आशा आकांक्षांचं प्रतीक असेल, असा ठराव या बैठकीत एकमतानं मंजूर झाल्याचं, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीनं रेल्वे मंत्रालयाच्या तीन महत्त्वाच्या रेल्वे मार्गवाढीच्या प्रकल्पांना मंजुरी दिली. या प्रकल्पांमध्ये राज्यातल्या गोंदिया – जबलपूर मार्ग दुहेरीकरणाचा समावेश आहे.

**<u>विधीमंडळकामकाज</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत ११ हजार ९७५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. यात कृषी आणि उद्‌योग क्षेत्राशी संबंधित मागण्यांचा समावेश आहे.

अमली पदार्थांबाबत शून्य सहिष्णुता हे सरकारचं धोरण आहे असं मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितलं. कुरिअरद्वारे अमली पदार्थ पाठवले जात असल्यास अशा कुरिअरवर कारवाई केली जाईल असं सांगून अमली पदार्थ विक्रीत दोषी ठरलेल्या पोलिसांना बडतर्फ केलं जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

आयुष्यमान भारत आणि महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना राबवणं यापुढे सर्व पात्र रुग्णालयांना बंधनकारक असेल, टाळाटाळ करणाऱ्या रुग्णालयांवर कडक कारवाई केली जाईल असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

कोणालाही डिजिटल अरेस्ट करता येत नाही. अशा प्रकारचा कॉल, मेसेज किंवा व्हिडिओ कॉल आल्यास नागरिकांनी तत्काळ १९३० या सायबर हेल्पलाईनवर संपर्क साधावा. अशा प्रकरणात जनजागृतीसाठी राज्य आणि केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहीम राबवली जात असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

कर्करोग तपासणीसाठी राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये वाहनं उपलब्ध करुन दिली जातील असं सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितलं.

यावर्षीच्या हंगामामध्ये धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन रक्कम देण्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल, असं अन्न आणि नागरी पुरवठा राज्यमंत्री योगेश कदम विधानसभेत म्हणाले.

राज्यातील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागानं विविध कठोर उपाययोजना हाती घेतल्या असून दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या चालकांवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या कोकणातल्या बागांचे पंचनामे करून आंबा बागायतदारांना योग्य नुकसानभरपाई देऊ, असं आश्वासन फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी विधानपरिषदेत दिलं.

सरकार केवळ भुलथापा देऊन, आकर्षक घोषणा करून, लोकांची फसवणूक करत आहे अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी केली. विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावरील चर्चेत ते बोलत होते. मराठवाड्यातल्या रखडलेल्या सिंचन योजना पूर्ण करण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी द्यावं अशी मागणी शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांनी केली.

**<u>डीजीसीएकारवाई</u>**

बारामतीमध्ये गेल्या महिन्यात २८ तारखेला झालेल्या लीयरजेट 45 विमान अपघातानंतर, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं म्हणजेच D G C Aनं VSR व्हेंचर्स या कंपनीवर कारवाई केली आहे. या कंपनीचं विशेष सुरक्षा लेखापरीक्षण केल्यानंतर त्यात विमानाची उड्डाण करण्याची क्षमता, हवाई सुरक्षा आणि फ्लाइट ऑपरेशन्स या संदर्भात अनेक त्रुटी आढळल्या. देखभाल प्रक्रियेत गंभीर उणिवा असल्यामुळे VSR व्हेंचर्सच्या चार विमानांची उड्डाणं पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आली आहेत. कंपनीनं या त्रुटींबाबत सविस्तर अहवाल आणि कारणमीमांसा

सादर करण्याच्या सूचनाही डी जी सी ए नं दिल्या आहेत. बारामतीमध्ये गेल्या महिन्यात २८ तारखेला झालेल्या विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला होता.

**<u>शिक्षणमंत्री</u>**

राज्य शासनाच्या विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी सर्व शाळांमध्ये प्रमुख पाच ते सहा योजनांची ठळक माहिती देणारे फलक प्रदर्शित केले जावेत, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या विविध योजनांबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. प्रमुख योजनांची माहिती ठळक स्वरूपात तीन बाय चार आकाराच्या फलकाद्वारे प्रत्येक शाळेमध्ये दर्शनी जागी लावावी असं त्यांनी सांगितलं.

**<u>वातावरणीयकृतीआराखडा</u>**

रत्नागिरी जिल्ह्याच्या विकास आणि वातावरणीय कृती आराखड्याचं प्रकाशन काल जिल्हाधिकारी मनुज जिंदल आणि आयफॉरेस्ट संस्थेच्या डॉ. श्रेष्ठा बॅनर्जी यांच्या हस्ते झालं. अशा प्रकारचा वातावरणीय कृती आराखडा तयार करणारा रत्नागिरी हा देशातला पहिला जिल्हा ठरला आहे. राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाची ज्ञान भागीदार असलेल्या आयफॉरेस्ट या संस्थेने हा अहवाल तयार केला आहे.

**<u>हवामान</u>**

विदर्भात तुरळक ठिकाणी आज मेघगर्जना आणि विजांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.